# येरवडा महिला कारागृह

महिला कारागृहातील महिला बंद्याच्या कलागुणांना वाव मिळण्याकरिता दिवाळीचे निमित्त साधुन महिला बंदीनी दिपावलीच्या पणत्या आकर्षक रंगवून सुशोभित करण्याचे काम केले आहे. महिला बंदी हे काम आवडीने व उत्सफुर्तपणे करीत आहेत. उत्साहाने महिला बंद्यानी या कामात भाग घेतला आहे. येरवडा कारागृह विक्री केंद्रामध्ये दिवाळी मेळाव्याचे आयोजन दि.१८.१०.१३ ते २४.१०.१३ पर्यंत करण्यात आलेले असून सदर मेळाव्यामध्ये येरवडा महिला कारागृहातील महिला बंदीनी आकर्षक रंगविलेल्या पणत्या तसेच इतर अनेक वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या आहे व त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे.



दि. ०२/१०/१३ रोजी येरवडा महिला कारागृहात गांधी जयंती निमित्त कार्यक्रम घेण्यात आला यामध्ये महिला बंदयांनी तयार केलेले पथनाटय तसेच गांधीजीचे भजन महिला बंदयाद्वारे सादर करण्यात आले. महिला बंदयासाठी महिलांच्या नर्सिंग कोर्स घेण्यात आलेला आहे त्या कोर्स मधील महिला बंदीनी नर्सिंग कोर्सचे फायदे व नर्स कशी असावी या विषयावर सदर पथनाटय केले. सदर कार्यक्रमास २०० महिला बंदी उपस्थित होत्या.